CNR No.MHSN100006622022

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०९/२०२२ मधील

## निशाणी क्र.५ वरील आदेश

अर्जदार हिने मूळ अर्ज जाबदार यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२, १८ ते २३ अन्वये दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज दरम्यानची पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

## अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–

०२. अर्जदारचे असे कथन आहे की, अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह दि.२५.०५.२०१० रोजी झालेला आहे. अर्जदारचे आईवडिलांनी २० तोळे सोने देऊन संसारोपयोगी साहित्य देऊन अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह झाला होता. जाबदार क्र.२ ही अर्जदारची सासू असून जाबदार क्र.३ व ४ या अर्जदारच्या नणंदा आहेत. जाबदार क्र.१ ने दि.२०.०३.२०२२ व दि.०२.०६.२०२२ रोजीच्या नोटीसा केवळ पुरावा उभा करणेसाठी दिलेल्या आहेत. जाबदार क्र.१ यास अर्जदारला नांदवण्याचे नसलेने जाबदार क्र.१ हे घरातून बेपत्ता होणे, नोटीसा पाठविणे, अर्जदारवर विनाकारण आरोप ठेवणे असे प्रकार करत होते. जाबदार क्र.१ ने त्यांची बहीण मतिमंद असताना भोळी आहे असे सांगितले. मात्र, लग्नानंतर अर्जदारला जाबदार क्र.१ ची बहीण आरडाओरड करणे, थुंकणे, गरळ गाळणे हे प्रकार करत असलेचे पहायला मिळाले. अर्जदारला खोटी माहिती देऊन लग्न केलेचे निदर्शनास आलेनंतर त्याबद्दल जाबदार क्र.२ ला विचारणा केली असता तिने अर्जदारला त्रास व शिवीगाळ करणेस सुरुवात केली. जाबदार यांनी अर्जदारचे वडिलांकडून हट्टाने चारचाकी गाडी मागून घेतली होती. जाबदार क्र.१, त्यांचे आई व बहिणी या अर्जदार हिला टोमणे मारणे, अपमान करणे, काम येत नाही म्हणणे, शिव्याशाप देणे अशा गोष्टी करु लागल्या. जाबदार क्र.१ ने वीस तोळे सोने भांडवलासाठी काढून घेतले व गहाण ठेवले.

०३. अर्जदार हिला संभाळणेची जाबदार क्र.१ ची पूर्ण जबाबदारी असताना अर्जदार हिस हाकलून दिलेपासून जाबदारने कोणतीही विचारपूस केली नाही अगर तिचे पोटापाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. जाबदार क्र.१ याची निरनिराळ्या गावामध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्तीची दुकाने आहेत. त्यापासून जाबदार क्र.१ यास महिन्याला रु.४०,०००/– मिळतात. तसेच जाबदार यांचा चार एकर ऊस असून त्यातून वर्षाला सहा लाख रुपये त्यांना मिळतात. अर्जदार हिचा मूळ अर्ज चालून निकाल होणेस बराच कालावधी लागणार असल्यामुळे अर्जदार हिस उदरनिर्वाहाकरिता दरम्यानची पोटगी म्हणून दरमहा रु.१०,०००/– जाबदार क्र.१ यांचेकडून अर्जदार हिस देणेबाबत आदेश होणेची विनंती अर्जदारने केली आहे.

जाबदार क्र.१ ते ४ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–

०४. अर्जदारचे प्रस्तुत अर्जास जाबदार क्र.१ ते ४ यांनी निशाणी क्र.१८ वर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल करुन त्यांनी अर्जदारचे अर्जातील व शपथपत्रातील सर्व मजकूर खोटा व लबाडीचा असून तो जाबदार यांनी मान्य व कबूल केलेला नाही. जाबदार असे कथन करतात की, जाबदार क्र.१ व अर्जदार यांचे लग्न झाले असून सदर लग्न संबंधातून कोणतेही आपत्य जन्मलेले नाही. सदरचे लग्न प्रसंगी जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास पाच ग्रॅम सुवर्ण अंगठी व मंगळसूत्र घातले होते आहे. सुरुवातीचे काळात जाबदार क्र.१ यांनी अर्जदार चे बोलणेकडे दुर्लक्ष केले. परंतू, अर्जदारने आपला विटा येथे राहणेस जाण्याचा हट्ट सोडला नाही. अर्जदार जाबदार क्र.१ यांना “मला विटा येथेच राहायचे आहे मी चितळी येथे राहणार नाही जाबदार क्र. १ आला नाही तर मी माझा जीव देईन" अशी धमकी देवू लागली.

०५. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार घरचे लोकांशी सतत भांडण करू लागली. आपला विटा येथे जाण्याचा हटट पूर्ण होणेसाठी अर्जदार कोणत्याही टोकाची भूमीका घेणेचे दरवून घरावरून उडी मारण्याचा प्रयत्न

केला. त्यावेळी जाबदार क्र.१ यांनी अर्जदारला समजावून सांगून कसे बसे खाली उतरवले. जाबदार क्र.१ यांना आपले आपले वयस्कर आई वडील व मतीमंद बहीण यांना सोडून पुढील अनर्थ टाळणेसाठी अर्जदार घेवून विटा येथे वास्तव्यास रहावे लागले. जाबदार क्र.१ यांनी कर्ज काढून अर्जदारसाठी शिलाई मशिन खरेदी केले. अर्जदार थोडेच दिवसात आता मी शिवणकाम करणार नाही असे सांगून शिवणकाम न करताच सदरचा व्यवसाय बंद केला.

०६. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, जाबदार क्र.१ व अर्जदार यांना लग्न करून सात वर्ष झाली असल्याने दोघांनी मुलबाळ होणेसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणेचे ठरवून सल्ला घेतला असता डॉक्टरांनी अर्जदारांना वजन कमी करावे लागेल असे सांगितलेमुळे जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांना जीममध्ये प्रवेश घेवून दिला. अर्जदारचे निष्काळजीने तीन वेळा गर्भपात होवून जाबदार क्र.१ यांना मुलाबाळापासून वंचित रहावे लागलेले आहे. जाबदार क्र.१ यांचे गावी वयस्कर आई व भोळसर बहीण आहे. जाबदार क्र.१ यांचेवर आपले वडीलांचे निधना नंतर त्यांचा सांभाळ करणेची जबाबदारी जाबदार क्र.१ यांचेवर असताना केवळ अर्जदाराचे हट्टापाई त्यांचा व गावाचा त्याग करून विटा येथे वास्तव्यास रहावे लागले आहे.

०७. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेशी वारंवार भांडणे काढून वारंवार माहेरी जावून राहिली जाबदार क्र.१ यांचे नातेवाईक अर्जदाराला परत समजावून सांगून नांदावयास आणत होते. अर्जदार कसेबसे चितळी येथे राहण्यास तयार झाले असता केवळ पाच किमी अंतर गेलेवर लगेच आपले बोलणे फिरवले व मी सात दिवसच राहणार परत राहणार नाही असे म्हणून परत विटा, ता.खानापूर येथे राहणेस आली. अर्जदारने मनस्ताप होईल असे वागून बोलून जाबदार क्र.१ यांचा मानसिक छळ केलेला आहे. अर्जदार केवळ आपले विटा येथे राहणेचे मागणीवर ठाम राहून त्यावावतच विचारणा करू लागली. त्यामुळे, सतत जाबदार क्र.१ यांना मानसिक तणावाखाली रहावे लागले

आहे.

०८. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, जाबदार क्र.१ कामानिमित्त बाहेर गावी गेले असता अर्जदार नाहक जाबदार क्र. १ यांचे आईला व बहीणीला शारीरीक व मानसिक त्रास देणेचे हेतूने अपशब्द बोलणे, धमकी देणे, उपाशी ठेवणे, दुसरे घर बांधून पाहिजे असा हट्ट करीत होती. जाबदार क्र.१ यांनी अर्जदारकडून होणाऱ्या छळास कंटाळून व अर्जदारकडून मिळणाऱ्या धमक्यामुळे बेकायदेशीर राहणेचा तसेच अर्जदारकडून होणारा शारीरीक मानसिक त्रास असह्य झालेनंतर सदर घटनेची कल्पना पोलिस उपनिरीक्षक, मायणी पोलीस स्टेशनला दि.०५/०५/२०२२ रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही.

०९. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारचे आईवडीलांची सोने चांदीची दुकानदारी असल्याने अर्जदार यांना सोनेचांदी दागिण्याचा हव्यास होता. जाबदार क्र.१ यांनी वेळोवेळी दागिणे खरेदी केले त्याचा आर्थिक भार जाबदार क्र.१ यांना सहन झाला नाही. कर्जाचे फेडीसाठी त्यावर नवीन कर्ज घ्यावे लागत आहे. अर्जदारचे चैनीखोर स्वभावामुळे जाबदार क्र.१ कर्जबाजारी झालेले आहेत. त्याला स्वताची उपजिवीका करणे अशक्य झाले आहे. जाबदार क्र.१ एकटा असल्याने त्यावर वयस्कर आई व मतीमंद बहीण यांची जबाबदारी असल्यामुळे, बेरोजगारीमुळे उपासमार येवून अजारपणामुळे त्याला काम करणे अश्यक्य होत आहे. तरी वरील खर्चामुळे व तुटपुंज्या रोजगारामुळे अर्जदार क्र.१ यांना उचलून पोटगी देणेची ऐपत जाबदार क्र.१ यांचेकडे नाही. जाबदार क्र.१ सन्यास मार्गाचा वापर करीत असून मिळेल तेथे राहून मिळेल ते खावून आपली उपजिवीका करीत आहेत. त्यामुळे, ते अर्जदारला पोटगी देवू शकत नाहीत. त्यामुळे, अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज रद्द करणेत यावा अशी विनंती जाबदार यांनी केली आहे.

१०. प्रस्तुतकामी अर्जदारातर्फे ॲड. आय.एच. बागवान यांचा व जाबदार

क्र.१ ते ४ तर्फे ॲड. एस.एम. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार व जाबदार यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन पुढील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यांची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे नोंदवीत आहे;

| अ.क्र. | विचाराधीन बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचेवर जाबदारकडून कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे, ही बाब तिने प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे काय? | होय |
| २. | जाबदार यांनी संयुक्तिक कारण नसताना अर्जदारच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही, ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | होय |
| ३. | अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | अंशतः होय |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>विचाराधीन बाब क्र.१ बाबतः</u>-**

११. प्रस्तुतचा कायदा हा स्त्रीयांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आलेला आहे. उभय पक्षकार जे एकमेकांवर आरोप करत आहेत त्याबाबत पुरावा येणे अद्याप बाकी आहे. प्रस्तुतचा अंतरिम पोटगी मिळण्याच्या अर्जाचा विचार करताना अर्जदार क्र.१ हिच्यावर जाबदार यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे, ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली पाहिजे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह झालेची बाब निर्विवादित आहे. अर्जदार हिच्या कथनानुसार, जाबदार क्र.१

यास अर्जदारला नांदवण्याचे नसलेने जाबदार क्र.१ हे घरातून बेपत्ता होणे, नोटीसा पाठविणे, अर्जदारवर विनाकारण आरोप ठेवणे असे प्रकार करत होते. जाबदार क्र.१ ने त्यांची बहीण मतिमंद असताना भोळी आहे असे सांगितले. मात्र, लग्नानंतर अर्जदारला जाबदार क्र.१ ची बहीण मतिमंद असून अर्जदारला खोटी माहिती देऊन लग्न केलेचे निदर्शनास आलेनंतर त्याबद्दल जाबदार क्र.२ ला विचारणा केली असता तिने अर्जदारला त्रास व शिवीगाळ करणेस सुरुवात केली. जाबदार यांनी अर्जदारचे वडिलांकडून हट्टाने चारचाकी गाडी मागून घेतली होती. जाबदार क्र.१, त्यांचे आई व बहिणी या अर्जदार हिला टोमणे मारणे, अपमान करणे, काम येत नाही म्हणणे, शिव्याशाप देणे अशा गोष्टी करु लागल्या. जाबदार क्र.१ ने वीस तोळे सोने भांडवलासाठी काढून घेतले व गहाण ठेवले. ही सर्व कथने अर्जदार हिने निशाणी क्र.६ कडे शपथपत्र सादर करुन केलेली आहेत.

१२. याउलट, जाबदार यांचे कथनांप्रमाणे विवाहानंतर सुरुवातीचे काळात जाबदार क्र.१ यांनी अर्जदार चे बोलणेकडे दुर्लक्ष केले. परंतू, अर्जदारने आपला विटा येथे राहणेस जाण्याचा हट्ट सोडला नाही. अर्जदार जाबदार क्र.१ यांना "मला विटा येथेच राहायचे आहे मी चितळी येथे राहणार नाही जाबदार क्र. १ आला नाही तर मी माझा जीव देईन" अशी धमकी देवू लागली. अर्जदार घरचे लोकांशी सतत भांडण करू लागली. तिने घरावरून उडी मारण्याचा प्रयत्न केला. जाबदार क्र.१ यांनी कर्ज काढून अर्जदारसाठी शिलाई मशिन खरेदी केले. अर्जदार थोडेच दिवसात आता मी शिवणकाम करणार नाही असे सांगून शिवणकाम न करताच सदरचा व्यवसाय बंद केला. अर्जदारचे निष्काळजीने तीन वेळा गर्भपात होवून जाबदार क्र.१ यांना मुलाबाळापासून वंचित रहावे लागलेले आहे.

१३. अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेशी वारंवार भांडणे काढून वारंवार माहेरी जावून राहिली जाबदार क्र.१ यांचे नातेवाईक अर्जदाराला परत समजावून सांगून नांदावयास आणत होते. अर्जदारने मनस्ताप होईल असे वागून बोलून जाबदार क्र.१ यांचा मानसिक छळ केलेला आहे. अर्जदार केवळ आपले विटा येथे

राहणेचे मागणीवर ठाम राहून त्याबाबतच विचारणा करू लागली. त्यामुळे, सतत जाबदार क्र.१ यांना मानसिक तणावाखाली रहावे लागले आहे. जाबदार क्र.१ कामानिमित्त बाहेर गावी गेले असता अर्जदार नाहक जाबदार क्र.१ यांचे आईला व बहीणीला शारीरीक व मानसिक त्रास देणेचे हेतूने अपशब्द बोलणे, धमकी देणे, उपाशी ठेवणे, दुसरे घर बांधून पाहिजे असा हट्ट करीत होती, अशी कथने जाबदार यांनी केली आहेत.

१४. अर्जदार हिने तिला जाबदार यांनी दिलेल्या मानसिक व शारीरिक त्रासाबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदार ही कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय जाबदार यांना सोडून गेली असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाले, असे म्हणता येणार नाही. अर्जदार व जाबदार क्र.१ चे पती–पत्नीचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. जाबदार क्र.१ हा अर्जदारचा पती असून तिचे उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने जाबदार क्र.१ यांच्यावर आहे. अर्जदारचे असे म्हणणे आहे की, जाबदार क्र.१ यांनी त्यांना पूर्णपणे दुर्लक्षीत केलेले असून तिची कोणतीही सोय त्याने केलेली नाही. कोणतीही भारतीय स्त्री ही कोणतेही संयुक्तिक कारण नसताना विनाकारण तिच्या पतीविरुध्द तो तिच्या उदरनिर्वाहाची सोय करत नाही किंवा तिला दुर्लक्षित करत आहे तसेच तिचेवर हिंसाचार झालेची बाब शपथेवर खोटे कथन करेल, असे गृहीत धरणे उचित होणार नाही. तसेच उपलब्ध पुराव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जदार हिचेवर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झालेची बाब प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे, विचाराधीन बाब क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र.२ व ३ बाबतः–**

१५. जाबदार क्र.१ हा अर्जदारचा पती असून अर्जदारची उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने जाबदार क्र.१ यांच्यावर आहे. अर्जदारचे असे म्हणणे आहे की, अर्जदारला नाईलाजास्तव आश्रितासारखे जीवन जगावे लागत आहे. जाबदार यांनी त्यांना पूर्णपणे दुर्लक्षीत केलेले आहे व त्यांची कोणतीही सोय

जाबदार यांनी केलेली नाही. कोणतीही भारतीय स्त्री ही कोणतेही संयुक्तिक कारण नसताना विनाकारण तिच्या पतीविरुध्द तो तिच्या उदरनिर्वाहाची सोय करत नाही किंवा तिला दुर्लक्षित करत आहे असे शपथेवर खोटे कथन करेल, असे गृहीत धरणे उचित होणार नाही. जाबदार क्र.१ याने अर्जदारची उदरनिर्वाहाची, कपडेलत्ता, औषधोपचार व इतर आवश्यक दैनंदिन गरजा पुरविण्याची कोणतीही सोय केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. पती या नात्याने अर्जदारांचा सर्व उदरनिर्वाहाचा, दैनंदिन खर्च, औषधोपचाराचा खर्च जाबदार क्र.१ यांनी पुरविणे ही त्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी व कर्तव्य आहे. त्यामुळे, अर्जदार यांना लागणारा उदरनिर्वाहाचा खर्च, कपडेलत्ता, दैनंदिन खर्च, औषधोपचाराचा खर्च या बाबींचा विचार करता अर्जदार यांना दरम्यानची पोटगी देणे न्यायोचित व गरजेचे वाटते.

१६. दरम्यानची पोटगी ठरविताना जाबदार यांचे उत्पन्नाचे साधन व त्याच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्या या गोष्टी विचारात घेणे जरुरीचे आहे. अर्जदारचे शपथेवरील कथनाप्रमाणे जाबदार हा धडधाकट असून जाबदार क्र.१ चा जाबदार क्र.१ याची निरनिराळ्या गावामध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्तीची दुकाने आहेत. त्यापासून जाबदार क्र.१ यास महिन्याला रु.४०,०००/- मिळतात. तसेच जाबदार यांचा चार एकर ऊस असून त्यातून वर्षाला सहा लाख रुपये त्यांना मिळतात. त्यामुळे, जाबदार क्र.१ हा अर्जदारला पोटगी देण्यास सक्षम आहे, अशी कथने अर्जदार हिने शपथेवर केलेली आहेत.

१७. याउलट, जाबदार क्र.१ याने असे कथन केले आहे की, जाबदार क्र.१ एकटा असल्याने त्यावर वयस्कर आई व मतीमंद बहीण यांची जबाबदारी असल्यामुळे, बेरोजगारीमुळे उपासमार येवून आजारपणामुळे त्याला काम करणे अशक्य होत आहे. तरी वरील खर्चामुळे व तुटपुंज्या रोजगारामुळे अर्जदार क्र.१ यांना उचलून पोटगी देणेची ऐपत जाबदार क्र.१ यांचेकडे नाही. जाबदार क्र.१ सन्यास मार्गाचा वापर करीत असून मिळेल तेथे राहून मिळेल ते खावून आपली

उपजिवीका करीत आहेत.

१८. अभिलेखाचे अवलोकन केले असता जाबदार क्र.१ चे वडील शिवाजी नारायण पवार यांचे नांवे मौजे चितळी, ता.खटाव, जि.सातारा येथे शेतजमीन असलेचे निशाणी क्र.२२ ते २९ उताऱ्यांवरुन दिसून येते. अर्जदार हिची उदरनिर्वाहाची जबाबदारी जाबदार क्र.१ यांना नाकारता येणार नाही. मूळ अर्जाचा गुणदोषावर काम चालून अंतिम निकाल लागण्यास कालावधी लागणार असून योग्य तो निर्णय होणार आहे. या घडीला अर्जदारला पालनपोषणकरिता आश्रितासारखे अवलंबून राहावे लागत असलेचे गृहीत धरुन व सध्याची महागाई गृहीत धरुन अर्जदारला दरम्यानची पोटगी म्हणून दरमहा रु.३,५००/- (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासून केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी, असे निर्देश जाबदार क्र.१ यांना देणे संयुक्तिक व उचित वाटते. सबब, विचाराधीन बाब क्र.२ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे व विचाराधीन बाब क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार सौ.पूनम चेतन पवार हिला अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रु.३,५००/- (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे मात्र) दरम्यानची पोटगी म्हणून जाबदार क्र.१ यांनी द्यावी.

३. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Digitally signed by MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Date: 2023.11.01 17:10:26 +0530

विटा.
दिनांकः-०१.११.२०२३.

(मो.शारीक ए.यु.रहेमान)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad, |
| Name of the Court | :- | M.S.A.U.Rahman,<br>Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 01.11.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 01.11.2023 |
| Order uploaded on | :- | 01.11.2023. |